नियमित दिवाणी दावा क्र. ६३/२०१३
राधाबाई व इतर वि. सुवर्णा व इतर
CNR No. MHSI080005722013
निशाणी क्र.१०० वर आदेश

०१. प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहितेच्या ऑर्डर २६ नियम ९ प्रमाणे कोर्ट कमिशनर यांची फेर नियुक्ती करण्याकरीता केला आहे. वादीतर्फे लेखी म्हणणे नि.क्र.१०१ चे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांचेतर्फे विद्वान वकील यांचे युक्तीवाद ऐकले.ृ

०२. प्रस्तुत अर्जात प्रतिवादी यांनी असे कथन केले आहे की, दावा मिळकतीत वादी क्र.३ हिने गट क्र.१०३५ मध्ये बेकायदेशीरपणे नवीन बांधकाम केले आहे. त्याकरीता या कामी उपअधीक्षक, भूमी अभिलेख, कणकवली यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक करण्यात आली होती. त्यानुसार, दि.२७/०२/२०२० रोजी उपअधिक्षक, भूमि अभिलेख, कणकवली हे प्रत्यक्ष जागेवर कोर्ट कमिशन करण्याकरीता गेले. परंतू, वादी क्र.३ हे मयत असल्याने कोर्ट कमिशन करण्यात आले नाही. नि.क्र.८२ वर भूमि अभिलेख यांचा अहवाल आलेला आहे. वादी क्र.३ यांचे वारस या कामी दाव्यात समाविष्ट करण्यात आले आहेत. वादी क्र.३ यांचा मुलगा ३(२)चेतन चंद्रकांत फोंडेकर हेच वारस आहेत. नि.क्र.९५ वर फेर कोर्टकमिशन अर्ज दि.२६/०८/२०२२ रोजी देण्यात आला होता. परंतू, वादीतर्फे वकील व वादी हे कोर्टात हजर नसल्याने अर्ज नॉट प्रेस करुन आदेशावर ठेवण्यात आला होता. त्यानंतर, वादी हजर झाले. तरी, पुन्हा कोर्ट कमिशन करण्याकरीता, उपअधिक्षक, भूमि अभिलेख, कणकवली यांची नेमणूक करण्यात यावी अशी विनंती वादीने केली आहे.

०३. वादी यांनी सदर अर्जावर आपले म्हणणे निशाणी क्र.१०१ प्रमाणे सादर करुन अर्जास प्रखर विरोध दर्शवला आहे. त्यांनी सदर अर्जातील मजकुरास स्पष्ट नकार दिला आहे.

त्यांनी असे कथन केले आहे की, वादीने प्रस्तूत दावा वाटपाकरीता दाखल केला आहे. वादीचा दावा आज्ञार्थी ताकिद किंवा मनाईकरीता नाही. त्यामुळे, सदर कामी कोर्ट कमिशनची आवश्यकता नाही. वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान हद्दीवरुन कोणताही वाद नाही. प्रतिवादी हे कोर्टाच्या मदतीने पुरावा गोळा करण्याचा प्रयत्न करु पाहत आहेत. प्रस्तूत कामी वादीने सरतपासातचे प्रतिज्ञापत्र दाखल केल्रू आहे. त्यामुळे, प्रस्तूत दावा चौकशीवर आहे. तसेच, प्रस्तूत प्रतिवादी यांनी यापुर्वी नि.क्र.९५ येथे कोर्ट कमिशनसाठी अर्ज दाखल केला होता. सदरचा अर्ज प्रतिवादी यांनी चालवायचा नाही म्हणून मागे घेतला आहे. एकूणच प्रतिवादी हे प्रस्तूत दाव्याचे कामकाजास विलंब व्हावा या हेतूने अशा स्वरुपाचे अर्ज देत आहेत. प्रस्तूत बाब म्हणजे न्यायप्रक्रियेचा दुरुपयोग आहे. त्यामुळे प्रतिवादीचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा.

०४. प्रस्तुत दावा वादीने वाटपाकरीता दाखल केलेला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसते की, प्रतिवादी क्र.०३ यांनी नि.क्र.५३ प्रमाणे उपअधिक्षक, भूमि अभिलेख यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक होऊन गट क्र.१०३५ ची मोजणी होणेकरीता अर्ज दाखल केला होता. सदर अर्ज माझे विद्वान पुर्वाधिकारी यांनी दि.२२/११/२०१८ रोजी मंजूर केला आहे. सदर आदेशाप्रमाणे न्यायालयीन आयुक्त हे यांच्याकडून मोजणी करण्यात आलेली नाही. प्रतिवादी यांनी असे कथन केले आहे की, वादी क्र.३ हे गट क्र.१०३५ यामध्ये बेकायदेशीर बांधकाम करत आहेत. त्यामुळे, मौजे तिवरे, ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग येथील गट क्र.१०३५ या दावा मिळकतीवर वादी यांनी बांधकाम केले आहे किंवा कसे याबाबत वास्तविक परीस्थितीत अभिलेखावर येणे आवश्यक आहे. परीणामतः माझ्यामते न्यायालयीन आयुक्त यांची नेमणुक करणे आवश्यक असल्याचे दिसते.

०५. वरील कारणमिमांसेचा सारांश असा आहे की, नि. क्र.१०० मंजूर होण्यास पात्र आहे. सबब मी खालील आदेश पारीत करीत आहे –

## आदेश

१. अर्ज निशाणी क्र.१०० मंजुर करण्यात येतो.

२. उपअधिक्षक, ता. भुमिअभिलेख कार्यालय, कणकवली यांची कोर्ट कमिशनर म्हणुन नेमणुक करण्यात येते.

३. कोर्ट कमिशनर यांनी मौजे मौजे तिवरे, ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग येथील गट क्र.१०३५ या दावा मिळकतीची एकत्रीत प्रचलित नियमानुसार मोजणी करावी.

४. कोर्ट कमिशनर यांनी सदर मिळकतींच्या हद्दीबाबत नकाशामध्ये स्पष्ट उल्लेख करावा. तसेच त्यावर बांधकाम असल्यास त्याचे क्षेत्र, मोजमापे लिहून चतुःसिमेसह वस्तुस्थिती दर्शक सविस्तर नकाशा व सविस्तर अहवाल न्यायालयात लवकरात लवकर सादर करावा.

५. सदर मोजणीस येणारा संपुर्ण खर्च प्रतिवादींनी करावा व **अतितातडीच्या मोजणीकरीता मोजणी फी** परस्पर उपअधिक्षक, भुमिअभिलेख कार्यालय, कणकवली यांच्याकडे जमा करावी.

६. प्रतिवादींनी दाव्याच्या प्रती व आवश्यक ती सर्व कागदपत्रे उपअधिक्षक, भुमिअभिलेख कार्यालय, कणकवली यांच्याकडे माहितीकरीता सादर करावे.

७. मोजणीपुर्वी व मोजणीच्यावेळेस उपअधिक्षक, भुमिअभिलेख कार्यालय, कणकवली यांनी नियमाप्रमाणे संपुर्ण कार्यवाही करावी व वादी तसेच प्रतिवादी यांना मोजणीची नोटिस निर्गमित करुन हजर राहण्यास सुचविण्यात यावे.

८. कोर्ट कमिशनर म्हणुन नियुक्ती झाल्याबाबत उपअधिक्षक, भुमिअभिलेख कार्यालय, कणकवली यांना पत्र देऊन कळविण्यात यावे.

९. प्रतिवादींनी वरील आदेशाप्रमाणे पुर्तता करावी.

सही/-
(टी.एच. शेख)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
कणकवली.

दिनांकः ०५/१२/२०२३